SATIMATA SHIKSHAN SANSTHA'S
DR. M. K. UMATHE COLLEGE
APPROVED BY GOV.T OF MAHARASHTRA & AFFILIATED TO RTM NAGPUR UNIVERSITY
Reaccredited by NAAC with B++
Lokseva Nagar, Bhamti, Ring Road, Nagpur - 440 022.
Ph. No. 0712 2227062, Fax : 0712 2230460 | mku_rmc@yahoo.co.in, umathecollege@gmail.com | Website : www.umathecollege.org

Shri Kishor Umathe
Secretary

Dr. D. V. Naik
Principal

Ref. No. MKU

Date : 12.08.2019

# अहवाल

## डॉ. एम.के. उमाठे कॉलेजच्या बुद्धीबळ स्पर्धेत अर्थव भजणे विजेता

सतीमाता शिक्षण संस्था नागपूर द्वारा संचालित डॉ. एम.के. उमाठे कॉलेज नागपूर येथे स्व. प्रकाशभाऊ उमाठे यांच्या 56 व्या जयंती प्रित्यर्थ एक दिवसीय रॅपीड ओपन चेस टुर्नामेन्टचे दि. 12.08.2019 ला समापन झाले.

या स्पर्धेचे उद्घाटन प्रा. रविंद्र सोनटक्के, न्यु मॉडेल महाविद्यालय, कारंजा घाडगे, यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात अशाप्रकारची स्पर्धा आयोजित करून संस्थेने उद्योन्मुख स्पर्धकांना संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे आभार मानले.

याप्रसंगी सतीमाता शिक्षण संस्थेचे सचिव श्री किशोरभाऊ उमाठे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती मंदाताई उमाठे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.व्ही. नाईक, नागपूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे संयोजक श्री उमेश पानबुडे सर, खापरखेडा येथील थर्मल पॉवर स्टेशन येथे अभियंता म्हणून कार्यरत असलेले श्री दिपक चव्हाण सर उपस्थित होते.

या प्रसंगी श्री. किशोरभाऊ उमाठे यांनी स्पर्धकांना स्पर्धेसाठी प्रोत्साहन देऊन शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे उद्घाटक प्रा. रविंद्र सोनटक्के यांनी सुद्धा शुभेच्छा देऊन उत्साह वाढविण्यासाठी स्पर्धकांना प्रोत्साहित केले. तसेच श्रीमती मंदाताई उमाठे यांनी स्पर्धकांचे कौतुक करून स्पर्धकांच्या बुद्धीला चालना मिळावी म्हणून ही स्पर्धा संस्थेतर्फे दरवर्षी घेण्यात येईल असे आश्वासन देऊन स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.व्ही. नाईक यांनी स्पर्धकांचा उत्साह द्विगुणीत करण्यासाठी व त्यांना भविष्यात संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष मार्गदर्शक म्हणून श्री उमेश पानबुडे सर व श्री दिपक चव्हाण सर यांनी मोलाचे सहकार्य केले. या स्पर्धेत एकूण 117 स्पर्धकांनी भाग घेतला.

या बुद्धीबळ स्पर्धेत अर्थव भजणे यानी 7.5 गुणासह पहिला क्रमांक पटकविला असून सौरभ लोखंडे व आदित्य बोडखे यांनी 7.0 गुणासह अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमाक पटकविला. पार्थ लोणकर, मयुर शेळके यांनी 6.5 गुणांसह तर पुज्जम बनसोड, चेतन देवढगले, सुमेध रामटेके, व्यंकटेष दांडे व अर्णव ढोके 6 गुणांसह प्राविण्य मिळवुन त्यांना ट्रॉफी व रोख बक्षिस देवून गौरविण्यात आले.

सात वर्ष वयोगटातील उत्कृष्ट मुले व मुली मध्ये शौनक बडोले आणि सौम्या जयस्वाल, उत्कृष्ट नऊ वर्ष वयोगटातील मुले व मुलींमध्ये सोहम रानडे आणि निलया कामडी, उत्कृष्ट अकरा वर्ष वयोगटातील मुले व मुली मध्ये आयुष रामटेके, लक्षिता राठोड, तर उत्कृष्ट तेरा वर्ष वयोगटातील मुले व मुली मध्ये ऋषिकेष लोहित, कृष्णा टावरी विजेते ठरले.

बक्षिस वितरण कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून धनश्री लेकुरवाळे, वर्ल्ड चॅंपियन– योगा, संस्थेचे सचिव श्री किशोरभाऊ उमाठे, संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती मंदाताई उमाठे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.व्ही. नाईक, प्रशिक्षक उमेश पानबुडे आणि मुख्य पंच श्री दिपक चव्हाण यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती अनासाने मॅडम व आभार श्री रणजित देषपांडे यांनी केले. तर समारोपीय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री दत्तोपंत पवार यांनी केले.

प्राचार्य

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

Scanned by CamScanner